FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर

0154161

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि., पहिली खबर क्र. 03, वर्ष 2023, दिनांक 21/02/2023
State District Police Station मुंबई FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.अधि.१९८८, कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार बुधवार, तारीख पासून २०/०२/२३ वेळ १८:३०, तारीख पर्यंत २१/०२/२३ वेळ १५:१६
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख २०/०२/२०२३ वेळ १८:३०
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ०६, तारीख २१/०२/२३ वेळ ०५:००
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ........, ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण उपनिबंधक सहकारी संस्था, एच पश्चिम विभाग, २ रा माळा, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
Nearest identifiable place वांद्रा बस डेपो समोर, वांद्रा (प) Village Post Taluka मुंबई Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव विपीन सेठ (b) वडिलांचे / पतीचे नाव सुनीलाल सेठ
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ६१ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ........
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........, दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय ........
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion शिख, जात Caste ........ जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता फ्लॅट नं. ६०३, ........ बिल्डिंग, ........ रस्ता, खार (प), मुंबई — वार्ड / गल्ली / सर्व्हे नं., घर / नाव नं., फोन / मो. नं., पॅन नं., वोटर्स नं.
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........, जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

१) गणेश सुर्वेराम राठोड, वय ३८ वर्षे, नोकरी - सहकार अधिकारी
२) गौतम शंकर वर्धन, वय-३१ वर्षे, नोकरी - उपनिबंधक

खरी नक्कल

पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with CamScanner

फिर्यादी श्री. विपीन चुनीलाल सेठ वय 61 वर्षे, धंदा- [illegible] रा. ठि.- फ्लॅट नं. 403, श्लोका बिल्डींग, 15 वा रस्ता खार (प.) मुंबई 52 यांचा स्वतंत्र जबाब कागदावर संगणकावर टंकलिखीत केला असून तो सोबत जोडण्यात आला आहे. सदर जबाब प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत येत आहे.

समक्ष

(सही)

उमेश कोरडे

पोलीस निरीक्षक

ला. प्र. वि. मुंबई

फिर्यादि सही (सही) Vipin

-फिर्याद-

दिनांक- ११/०२/२०२१

श्री. विपीन चुनीलाल सेठ, वय-६१ वर्षे, धंदा-कपडा मिल व्यवसायातून सेवानिवृत्त, रा.ठि. फ्लॅट नं. ४०३, श्लोका बिल्डींग, १५ वा रस्ता, खार (प.), मुंबई-५२. मो.क्र. ९८९२२११४३४.

मी वरील प्रमाणे असून नमुद पत्त्यावर माझे कुटूंबीयांसोबत सन २००५ पासुन रहावयास आहे. माझे सोबत माझी पत्नी कुमकुम सेठ व दोन मुली या सुध्दा रहावयास आहेत.

माझा दहिसर ( पुर्व ), मुंबई या परिसरात वुलन सिल्क मिल्सचा व्यवसाय होता. सध्या मी सदरचा व्यवसाय बंद केला आहे. मी आजारी असल्यामुळे सध्या माझे घरीच असतो. माझा दुसरा फ्लॅट माणिक मोती बिल्डींग, को. ऑपरेटीव्ह हाउसिंग सोसायटी, १७ वा रोड, खार (प.), मुंबई येथे आहे. सदर सोसायटीमध्ये सध्या कार्यरत असलेले संचालक मंडळ व सोसायटीचे पदाधिकारी यांच्या कामकाजाबाबत अनियमीतता होती. सदर सोसायटीव्दारा वार्षीक सर्वसाधारण सभा घेतल्या जात नव्हत्या, लेखापरिक्षण केले जात नव्हते तसेच सर्वसाधारण सभा त्यातील निर्णय याबाबत नोंदी नसल्याने मी दिनांक २२/०९/२०२० रोजी, उप निबंधक, सहकार संस्था, एच वॉर्ड, महाजन वाडी, रानडे रोड, दादर, मुंबई यांच्या कार्यालयात संचालक मंडळाचे विरूध्द माझे वकील आदित्य भट यांचे मार्फतीने तक्रार दाखल केली. त्यांनतर मी वकील आदित्य भट यांना निबंधक कार्यालयात केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विचारणा केली. सदरवेळी मला वकीलांनी सांगितले की, त्यांचे सहायक राहुल खंडेराव अडांगळे हे मला वेळोवेळी तक्रारीच्या अनुषंगाने सांगतील. दिनांक ०६/०२/२०२१ रोजी राहुल यांनी सांगितले की, " सदर तक्रार अर्जानुसार उप निबंधक श्री. वर्धन यांच्या कार्यालयात फाईल प्रलंबित आहे. सोसायटीवर कारवाई करण्याकरीता ते **बेकायदेशीर** पैशाची मागणी करीत आहेत. व किती पैसे पाहिजेत ते काही सांगत नाहीत आपण माझेसोबत स्वत: कार्यालयात येवून उप निबंधक श्री. वर्धन यांना पैशाबाबत बोला ''

उप निबंधक श्री. वर्धन यांनी पैशाची मागणी करीत असल्यामुळे व मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक १०/०२/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे समक्ष आलो व उप निबंधक श्री. वर्धन यांचेविरोधात तक्रार केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक कोरडे यांनी मी दिलेली तक्रार बरेच उशिरा म्हणने लोकसेवकांची कार्यालयाचे बंद होण्याच्या वेळेच्या दरम्यान दिलेली असल्याने त्यांनी दिनांक ११/०२/२०२१ रोजी लोकसेवकाचे कार्यालयात जावून भेट घेवून कामाबाबत चर्चा करण्याबाबत सुचित केले व लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, मुंबई येथे म्हणजे त्यांच्याच कार्यालयात बोलाविले.

आज रोजी मी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात मला बोलाविल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे आलो. सदरवेळी उप निबंधक श्री. वर्धन यांचे कार्यालयात जावून माणिक मोती को. ऑप. हाउसिंग सोसायटीचे विरूध्द केलेल्या तक्रारीवर कारवाई करण्यासंदर्भातील कामाबाबत चर्चा करून लोकसेवकाची प्रत्यक्ष भेट घेण्याबाबत पो. नि. कोरडे व स.पो.आ. कालेकर यांनी मला सांगितले. माझ्या खिशात डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लाववून त्याद्वारे मी व लोकसेवक यांच्यात होणारे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रित करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी माझेकडे लाचेची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाल्यास त्या अनुषंगाने पुढील सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगितले होते. तसेच सदरची कारवाई पंचांच्या समक्ष करणार असल्याबाबत सांगितले. त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई विभागाचे गोपनीय कक्षात गेलो. त्याठिकाणी पो.नि. कोरडे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये प्रथम पोनि कोरडे, माझे व पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यांनतर मी पो.नि. कोरडे पंच क्र.१ लठाड असे माझे खाजगी वाहनाने नॅशनल कॉलेज बांद्रा या ठिकाणी आलो. प्रवासादरम्यान राहुल याच्याबरोबर दोन वेळा मोबाईलवर संभाषण झाले आहे. लोकसेवक यांचे कार्यालयात पडताळणीकरीता पंच क्र. १ सह रवाना झालो त्यावेळी पोनि.कोरडे यांनी डीजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून मी परीधान केलेल्या कुर्त्याच्या वरील खिशात ठेवला होता. मी उप-निबंधक कार्यालय, बांद्रा रेल्वे स्टेशनजवळ आल्यानंतर तेथील कार्यालयाच्या आवारात मला माझ्या वकीलांचे सहायक राहुल हे तेथे होते. मी पंच श्री प्रविण लठाड व राहुल असे लोकसेवक श्री. वर्धन यानां भेटण्यासाठी दुसऱ्यां माळयावरील त्यांचे

समक्ष
(उमेश महेश कोरडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

खरी नक्कल
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner

केबीनमध्ये गेलो. मी आमचे सोसायटीचे तक्रारीच्या संदर्भात चर्चा केली. त्यावेळी लोकसेवक श्री. वर्धन यांनी त्यांचे कार्यालयातील राठोड यांना बोलाविले व मी केलेल्या तक्रारीची फाईल मागवून घेतली व फाईल पाहून मला लोकसेवक श्री. वर्धन यांनी सांगितले की, मी केलेल्या तकारअर्जाच्या संदर्भात दुसरे कर्मचारी श्री. राठोड यांच्याबरोबर चर्चा करावी. माझे काम श्री राठोड करतील त्यांना वर्धन यांनी त्यांना सर्व माहिती दिली असल्याचे सांगितले. त्यानंतर मी त्यांच्या कॅबीनमधुन बाहेर आलो व बाहेर श्री. राठोड जेथे बसतात तेथे त्यांना भेटलो व मी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली. सदरवेळी श्री राठोड हे श्री वर्धन साहेबांना त्यांच्या कॅबीनमध्ये जावुन माझ्या तकारीबाबत चर्चा करून आले ( हे मला श्री राठोड यांनी सांगितले) व मी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने काम करण्यासाठी रूपये ३ लाख एवढया रक्कमेची मागणी वर्धन साहेबांनी केल्याबाबत सांगितले. मी घरातील एकटा कमावता असल्याने मला एवढी रक्कम देता येणार नाही म्हणून मी पुन्हा लोकसेवक राठोड यांचेसोबत चर्चा केली व त्यांना तशी विनंती केली. मी श्री राठोड यांना केलेल्या विनंतीनुसार श्री राठोड हे लोकसेवक श्री वर्धन यांना पुन्हा त्यांच्या कॅबीनमध्ये भेटून आले व मला म्हणाले दोन बोटे दाखवुन इशाऱ्याने दोन लाख माझ्या कामासाठी लागतील असे सांगितले. परंतु मला तेवढे पैसे सुध्दा दयायला जमणार नसल्याबाबत मी लोकसेवक राठोड यांना सांगितले. त्यावेळी श्री राठोड यांनी रूपये एक लाख, दहा हजार इतक्या रक्कमेची मागणी केली. त्यानंतर मी पुन्हा श्री वर्धन यांची भेट घ्यावयाची असल्याबाबत श्री राठोड यांना सांगितले. तेव्हा राठोड, मी व राहुल असे श्री वर्धन यांच्या कॅबीनमध्ये गेलो. तेथे मी श्री वर्धन यांना माझ्या तक्रारीबाबत सांगितले. श्री वर्धन यांनी मला माझी तक्रार ते योग्य प्रकारे हाताळतील, त्यांची माझ्या बाजुने सुनावणी करतील, इतर माझ्या सोसायटीतील सदस्यांना सोसायटीची निवडणुक लढवण्याकरीता अपात्र करतील असे सांगितले. व सदरबाबत त्यांनी राठोड यांना सांगितले आहे श्री राठोड सांगतील त्याप्रमाणे करण्याबाबत मला, तसेच राहुल यांना हाताच्या बोटांनी इशारा केला. मला श्री वर्धन यांनी श्री राठोड यांच्या करवी त्यांनी मागणी केल्याप्रमाणे रक्कम देण्याबाबत इशारा दिल्याने व मी त्यांनी श्री राठोड हे माझ्याकडे १,१०,०००/– रूपयांची मागणी करीत असल्याबाबत स्पष्ट सांगितले होते. त्यांस श्री वर्धन यांनी मान हलवुन संमती दिल्याने मी लोकसेवक राठोड यांना सांगितले नुसार त्या कॅबीनमधुन बाहेर येवुन श्री राठोड यांना घरी जावुन पैसे घेवून येतो असे सांगुन मी व पंच श्री लठाड असे त्या कार्यालयातुन बाहेर आलो व सापळा पथक थांबले होते त्या ठिकाणी गेलो.

सापळा पथक जेथे थांबले होते तेथे आम्ही आल्यानंतर झालेल्या चर्चेबाबत मला व पंचाना पोनि कोरडे व सपोआ कालेकर यांनी विचारणा केली. तसेच डीजीटल व्हाईस रेकॉर्डवर झालेले संभाषण ऐकले. उपनिबंधक कार्यालयातील लोकसेवक श्री राठोड हे श्री वर्धन यांच्यासाठी लाचेची स्पष्ट मागणी केल्याची खात्री झालेनंतर पुढील सापळा कारवाई करणार असलेबाबत सुचित केले. व लाचेच्या रक्कमेकरीता लागणारे रक्कमेची तरतुद करण्याकरीता सांगितले म्हणून मी माझे रहाते घरी खार येथे जावून रूपये एक लाख घेवून आलो.

मी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी नॅशनल कॉलेज, बांद्रा येथे असताना श्री कोरडे व सपोआ कालेकर यांनी मला सापळा कारवाईबाबत घ्यावयाचे दक्षतेबाबत सुचना दिल्या व एक लाख रूपयाच्या नोटांना अ‍ॅन्थ्रासिन पावडर लावून सदरच्या नोटा लिफाफामध्ये ठेवून त्याला सुध्दा अ‍ॅन्थ्रासिन पावडर लावली व सदरचा लिफाफा माझेकडे दिला. सदरवेळी माझे कुडत्याचे वरील खिशात डीजीटल व्हाईस रेकॉर्डर ठेवला. त्यानंतर सदरची रक्कम घेवून मी व पंच श्री. लठाड असे मिळून उप–निबंधक कार्यालय, बांद्रा येथे दुसऱ्या माळयावर लोकसेवकांना भेटावयास तेथे कार्यालयाच्या आवारात उपस्थित असलेल्या सहायक राहुल याच्यासोबत आलो. सदरवेळी सापळा पथक हे माझ्या पाठीमागे कोणालाही संशय येणार नाही

समक्ष
(उमेश महेश कोरडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

खरी नक्कल
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner

अशारितीने कार्यालयाच्या दुसऱ्या माळयावर व कार्यालयाच्या परिसरात थांबले होते. मी लोकसेवक श्री राठोड यांना भेटलो. मागीतलेल्या रक्कमेबाबत विचारणा केली. त्यावेळी श्री राठोड यांनी मला "कितना है" अशी विचारणा केली. त्यावेळी मी एक पेटी, एक लाख आणलेबाबत सांगितले. त्यावेळी मला लोकसेवक राठोड हे बोलले की "आपको एक लाख दस हजार बोला था, एक क्यु लाया" त्यावेळी मी राहिलेले दहा हजार नंतर देतो असे सांगितिले. सदरची रक्कम लोकसेवक राठोड यांनी स्विकारुन टेबलचे उजव्या बाजुच्या खणामध्ये ठेवली, त्यानंतर मी पुन्हा श्री राठोड यांची परवानगी घेवुन श्री. वर्धन यांच्या कॅबीनमध्ये गेलो व श्री वर्धन यांनी मला सांगितल्याप्रमाणे श्री राठोड यांना रक्कम दिल्याबाबत सांगितले. मी कार्यालयाच्या बाहेर आलो. सापळा पथकातील अधिकारी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझे डोक्याचे केसावरून डावा हात फिरवून सापळा पथकात इशारा दिला. त्यानुसार तात्काळ सापळा पथकातील अधिकारी व अंमलदारांनी लोकसेवक राठोड व वर्धन यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी पंचांच्या समक्ष श्री राठोड यांना माझ्याकडुन घेतलेल्या लाचेच्या रकमेबाबत विचारले असता त्यांनी ती त्यांच्या वापरत्या टेबलचे खनामधून लाचेची रक्कम रू. एक लाख काढुन पोलीसांच्या व पंचांच्या सांगण्याप्रमाणे पंच श्री अभिजीत बोरोडे यांचे ताब्यात दिली.

तरी दिनांक ११/०२/२०२१ रोजी मी माणिक मोती बिल्डींग, को.ऑपरेटीव्ह सोसायटी, १७ वा रोड, खार पश्चिम मुंबई येथील सोसायटीचे संचालक व पदाधिकारी हे योग्य प्रकारे काम करीत नसल्याबाबत केलेल्या तक्रार अर्जावर कारवाई करण्याकरीता व माझ्या बाजुने निकाल देण्याकरीता लोकसेवक श्री. वर्धन यांच्याकरीता श्री राठोड यांनी रू. ३,००,०००/– लाचेची मागणी करून रूपये १,१०,०००/– वर तडजोड करून रूपये १,००,०००/– रोख रक्कम लाच स्विकारली असताना रंगेहाथ पकडले. म्हणून माझी लोकसेवक श्री. वर्धन व श्री राठोड याचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून मला मराठीत वाचुन हिंदीतून समजावून सांगितली. मी दिलेली फिर्याद माझे सांगणेप्रमाणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( उमेश कोरडे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

खरी नक्कल
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ....... तत्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य .......

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक .......

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील फि यांच्या सोसायटीचे संचालक व पदाधिकारी यांनी सोसायटीच्या कामकाजामध्ये अनियमितता केली असल्याने फिर्यादी यांनी केलेल्या तक्रार अर्ज हा लोकसेवक यांच्याकडे प्रलंबित होता. सदर तक्रार अर्जावर कारवाई करण्याकरीता व फिर्यादी यांच्या सोसायटीवर प्रशासक नेमण्याकरीता लोकसेवक गौतम वर्धन यांनी कायदेशीर पारिश्रमा खेरीज एक लाख दहा हजार रु. स्विकारण्याचे रु. तीन लाख मागणी करून तडजोडीअंती रुपये मान्य करून रु. एक लाख लाचलोकसेवक गणेश राठोड यांच्या मार्फतीने स्विकारताना रंगेहात पकडले म्हणून गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कालम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले

त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो.नि. उमेश कोरडे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, .......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......., जिल्हा ......., राज्य .......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name उमेश कोरडे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. .......

Posting

Code No. of I. O. .......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..... 12/2/21

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. I.O., 5. Office Copy.

खरी नक्कल

Attachment to item 7 of First Information Report

पोलीस निरीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner